# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.

पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- दिनांक.०१.०४.२०२०

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक २५.०३.२०२०.

२) कृषि आयुक्त,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र.आकृकक्ष/०६/२०२० दिनांक २७.०३.२०

**विषयः**- बीयाणे खते व किटकनाशके यांचे उत्पादन विक्री /वाहतूक व साठवणूकीस बंदीमधून वगळणेबाबत.

**आदेश**

त्याअनुषंगाने मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि ज्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भीय आदेशान्वये नांदेड जिल्हयात दिनांक.३१ मार्च २०२० रोजी पासून ते दि.१४.०४.२०२० चे २४.०० वा. पर्यंत जमावबंदी आदेश लागू करीत असून या कालावधीत (५) पाच व त्या पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास प्रतिबंध निर्गमित करण्यात आले आहे, त्यामध्ये जीवनावश्यक वस्तू / अत्यावश्यक सेवा प्रतिबंधामधून वगळण्यात आले आहे. तथापि मा. कृषि आयुक्त,महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे संदर्भिय पत्र दिनांक २७.०३.२०२० अन्वये बियाणे,खते व किटकनाशके या कृषि उपयोगी निवीष्ठाचे उत्पादन साठवणूक वाहतुक /पॅकींग व विक्री बाबींना परवानगीबाबत उचित कार्यवाही करण्याचे कळविले आहे.

त्याअर्थी, मी डॉ. विपीन इटनकर, भा.प्र.से. जिल्हादंडाधिकारी नांदेड, जिल्हयातील सर्व बियाणे,खते व किटकनाशके या कृषि उपयोगी निवीष्ठाचे उत्पादन साठवणूक वाहतुक /पॅकींग व विक्री करण्याची आस्थापना/कारखाने चालू ठेवणेबाबत याद्वारे पुनःश्च निर्देशित करीत आहे.

सदर आदेश पुढील आदेशापर्यंत अमलात राहील तसेच, यापूर्वी या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निर्देश व परिपत्रके या आदेशासह अमंलात राहतील.

Scanned by CamScanner

तसेच, सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधिताविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वा/-
(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड पोलीस अधीक्षक, नांदेड
३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नांदेड
४) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड
५) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
७) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद, नगरपंचायत, जि.नांदेड

OFFICE OF THE COLLECTOR NANDED.

जिल्हादंडाधिकारी, नांदेड

Scanned by CamScanner